ग्रामीण रुग्णालय बेळंकी, जि.सांगली येथील मुख्य इमारतीच्या बांधकामाच्या अंदाजपत्रक व आराखडयास अनुशेषांतर्गत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-२०१८/ प्र.क्र.२७९/ आरोग्य-४

मंत्रालय, १० वा मजला, संकूल इमारत,
गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई.

तारीख : २७ जून, २०१९.

<u>वाचा</u> :-

१) **सहसंचालक, आरोग्य सेवा रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र क्रमांकः संआसे/ कक्ष-३/टे-६/ग्रारुबेळंकीमुइवनिवाबांधकाम/९८५४-५५/१८, दि.१७.०९.२०१८.**

<u>प्रस्तावना</u> :-

बेळंकी, जि. सांगली येथील अनुशेषांतर्गत असलेल्या प्रस्तावित ग्रामीण रुग्णालयाच्या मुख्य इमारतीच्या बांधकामाचे सन २०१७-१८ च्या दरसूचीवर आधारित सदर अंदाजपत्रक व आराखडयास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासंदर्भात पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

बेळंकी, जि. सांगली येथील अनुशेषांतर्गत असलेल्या प्रस्तावित रुग्णालयाच्या मुख्य इमारतीच्या बांधकामाकरीता रु.१५५८.०० लक्ष च्या अंदाजपत्रक व आराखडयास खालील प्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

Name of the Department : PUBLIC HEALTH DEPARTMENT.					
Name of Work : Construction of 30 Beded Rural Hospital Building at BELANKI, Tal. Miraj, , Distt. Sangli.					
RECAPITULATION SHEET					
Sr. No.	Particulars of Items		Norms (Unit Rate Rs. Per Sqmt./Meter/LumpSum		Cost Rs.
(A)	**ESSENTIAL ITEMS**				
1	**Building proper**				
	Scope				
	(a)Ground Floors	1667.90	24255	Per Sqmt.	4,04,54,915
	(b)first Floors	1267.23	**20396.25**	Per Sqmt.	25846740
	(c)second Floors	824.26	**21367.5**	Per Sqmt.	17612380
	(d)Cost of Construction				**8,39,14,035**
2	**Electrification**	Internal	5 % of 1 (d)		41,95,702
		External	6 % of 1 (d)		50,34,842
				Total	**92,30,544**

3	**Water Supply and Sanitation**			5 % of 1 (d)	**41,95,702**
4	**Miscellaneous Items**				
	Compound Wall			Per Rmt.	41,82,741
	Approach and Internal Roads			Per Rmt.	27,97,200
	Parking Arrangements / garage			Lump Sum	5,00,000
	Street Lights etc.			Lump Sum	6,00,000
	MSEB Transformer and Connection			Lump Sum	7,00,000
	C C drain			Lump Sum	2,00,000
	furniture 3759.39*70 %	2631.57	3000	sqmt	78,94,710
	Rain Water Harvesting			Lump Sum	5,00,000
	Fire Fighting Arrangements			Lump Sum	5,00,000
	soil investigation			Lump Sum	2,00,000
	land development			Lump Sum	10,00,000
	ETP			Lump Sum	10,00,000
				Total	2,00,74,651
	Sub Total = (1)+(2)+(3)+(4)				**11,74,14,931**
	Sub Total (A)				**11,74,14,931**
(B)	**OPTIONAL ITEMS**				
Sr.	ITEMS				
1	Solar Water Heating Arrangemnts			Lump Sum	5,00,000
2	Parks and Gardening			Lump Sum	5,00,000
3	Bore Wel, pump house, sump well			Lump Sum	5,00,000
4	Lift				25,00,000
5	Air conditioned			Lump Sum	3,00,000
6	landscaping			Lump Sum	5,00,000
7	CCTV				5,00,000
8	WATER PURIFIRE				2,00,000
9	Architect and green building concept 5 % on A				58,70,747
	Sub total (B)				**1,13,70,747**
	PROJECT (A)+(B)			**(T)**	**12,87,85,678**
	Add 4 % for contingency				**51,51,427**
	Add 5% for Escalation				**64,39,284**
	Add 12 % for GST on (T)				**1,54,54,281**
	TOTAL COST OF PROJECT				**15,58,30,670**
	Say Rs. Lakhs				**1,558,00**

२. उपरोक्त अंदाजपत्रकाची प्रशासकीय मान्यता खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

१) काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तु विशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरु करावे.

२) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

३) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१, दि. १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

४) सदर कामाच्या बांधकामाचा खर्च सार्वजनिक आरोग्य विभागाने त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नियतव्ययामधून करण्यात यावा.

५) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्रमांक बीडीजी-२०१७/प्र.क्र.६०/इमा-२, दि.०७.०७.२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

६) नियोजित जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन सदर कामाच्यानिविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

३. सदर बांधकामांवरील खर्च “मागणी क्रमांक- एच-९, मुख्य लेखाशिर्ष - ४२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च, प्रादेशिक असमतोल दूर करणे, ०४ - सार्वजनिक आरोग्य, २०० - इतर कार्यक्रम, ग्रामीण रुग्णालये मुख्य इमारत (४२१० ०१४१), ५३ - मोठी बांधकामे" या लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या अनुदानामधून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय, मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या दि.१०.०६.२०१९ रोजीच्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीमधील इतिवृत्तान्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २०१९/३९/इमा-१, दि.१३.०२.२०१९ अन्वये त्या विभागाने दर्शविलेल्या सहमतीनुसार आणि वित्त विभागाच्या शा.नि. क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम,भाग-२, दि.१७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्ट भाग-पहिला, उपविभाग-पाच मधील अनुक्रमांक १ परिच्छेद क्र.१३४ नुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

५.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६२६११२१०२९११७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, serialNumber=ed0fa40788bb5c0d7f76b869fa2e5835af215c6a80eae8f70eaf87b0cf68d63f, cn=Pradip M Balkavde
Date: 2019.06.27 16:29:09 +05'30'

(प्र.मो.बलकवडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
२. सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई
३. सहाय्यक संचालक (लेखा व लेखापरिक्षा),आरोग्य सेवा, पुणे.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई/ पुणे.
५. उपसंचालक, आरोग्य सेवा (कोल्हापूर मंडळ), कोल्हापूर.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, सांगली.
७. जिल्हा शल्य चिकित्सक, सांगली.
८. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-१/२), मंत्रालय, मुंबई.
९. महालेखापाल, (लेखा व लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/ नागपूर.
१०.विनियम कार्यासन, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
१२.अवर सचिव (आरोग्य-३), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
१३.निवडनस्ती (आरोग्य-४).